महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

जा. क्रमांक : तंशिविकापु/विवि/तृतीय पंथी विध्यार्थी शुल्क/२०२४/ 105

08 JAN 2024

परिपत्रक

**विषय : राज्यातील तृतीयपंथीय विद्यार्थ्यांना उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या आधिपत्याखालील शिक्षणक्रमासाठी शैक्षणिक फी (शैक्षणिक शुल्क) माफ करणेबाबत...**

संदर्भ : १) शासन निर्णय क्र. एनईपी-२०२२/प्र.क्र.०९/विशि-३, शिकना, दि. ०७.१२.२०२३.
२) तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र DTEEM-D२/१०६/२०२३-DESK२ दि. २०.१२.२०२३.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, तृतीयपंथी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून त्यांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणून समान शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या आधिपत्याखालील सर्व प्रकारचे उच्च शिक्षण तृतीयपंथी विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने, विद्यापीठांनी विद्यापीठात तसेच त्यांच्याशी सलंग्नित महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या तृतीयपंथी विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी (शैक्षणिक शुल्क) विद्यापीठाच्या स्वनिधीतून भरावी असे निदेश महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ८(७) मधील तरतुदीनुसार देण्यात आल्याचे संदर्भिय शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या आधिपत्याखालील सर्व सलंग्नित शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित तंत्रनिकेतनामध्ये शिक्षण घेणाऱ्या तृतीयपंथीय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्या स्वनिधीतून भरण्यात यावे, असेही निदेश शासनाने संदर्भिय शासन निर्णयान्वये दिलेले आहे.

तरी संदर्भिय शासन निर्णयातील तरतुदीनुसार या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील सर्व संस्थाना सूचित करण्यात येते कि, आपण आपल्या संस्थेतील तृतीयपंथीय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफीचे प्रस्ताव संबधित विद्यापिठ अथवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडे सादर करावेत. सोबत संदर्भिय शासन निर्णय जोडला आहे.

सोबत : वरीलप्रमाणे..

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे १६.

प्रति,
प्राचार्य/संचालक,
शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित
पदवी व पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था,
पुणे विभाग.

प्रत : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव..

**राज्यातील तृतीयपंथीय विद्यार्थ्यांना उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील शिक्षणक्रमासाठी शैक्षणिक फी (शैक्षणिक शुल्क) माफ करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: एनईपी-२०२२/प्र.क्र.०९/विशि-३, शिकाना**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: ०७ डिसेंबर, २०२३

**संदर्भः-** तृतीयपंथीय व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९

**प्रस्तावना-**

तृतीयपंथीय व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९ मध्ये तृतीयपंथीयांच्या हक्कांचे आणि हिताचे रक्षण करण्यासाठी आणि शासनाने तयार केलेल्या कल्याणकारी योजनांमध्ये त्यांचा प्रवेश सुलभ करण्यासाठी शासन योग्य अशा कल्याणकारी उपाययोजना करेल. अशी तरतूद आहे. या
अधिनियमातील कलम २(के) मध्ये तृतीयपंथीय व्यक्तीची व्याख्या विहित करण्यात आली असून प्रकरण ३ मध्ये तृतीयपंथीय व्यक्तीची ओळख प्रमाणीकरणाबाबतच्या तरतूदी विहित केलेल्या आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० च्या राज्यामध्ये अंमलबजावणीच्या अनुषंगाने मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक ०५ डिसेंबर. २०२३ रोजी आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस अकृषि विद्यापीठांचे कुलगुरु उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये तृतीयपंथियांसाठी शैक्षणिक सुधारणा या विषयावर अकृषि विद्यापीठाच्या कुलगुरुंसह चर्चा करण्यात आली. तृतीयपंथी विद्यार्थांना उच्च शिक्षण घेण्यासाठी येणा-या अडचणी, आर्थिक समस्या विचारात घेऊन त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या अनुषंगाने अशा विद्यार्थ्यांना मोफत उच्च शिक्षण उपलब्ध करुन देण्यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घ्यावा यासाठी सर्व अकृषि विद्यापीठांना आवाहन करण्यात आले. सदर आवाहनाला प्रतिसाद देत सर्व कुलगुरुंनी एकमताने हा निर्णय मान्य केला आहे. याशिवाय, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील सर्व संलग्नित शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित तंत्रनिकेतनामधीलही तंत्र शिक्षण तृतीयपंथीय विद्यार्थ्यांना मोफत उपलब्ध करुन देण्याचेही निर्देश मा. मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) यांनी दिले आहेत. तरी, नमूद बैठकीतील सदर निर्णय व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० मधील सर्वसमावेशक शिक्षण पद्धती व समानता या मुद्यांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने तृतीयपंथीय विद्यार्थ्यांना या विभागाच्या अधिपत्याखालील उच्च शिक्षणक्रमांसाठी शैक्षणिक शुल्क सवलत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**<u>शासन निर्णय:</u>**

तृतीयपंथी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन त्यांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणून समान शिक्षण उपलब्ध करुन देण्यासाठी, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील सर्व प्रकारचे उच्च शिक्षण तृतीयपंथी विद्यार्थ्यांना मोफत मिळण्याच्या दृष्टीने, विद्यापीठांनी विद्यापीठात तसेच त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयात शिक्षण घेणा-या तृतीयपंथी विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी (शैक्षणिक शुल्क) विद्यापीठाच्या स्वनिधीतून भरावी असे निदेश महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ८ (७) मधील तरतूदीनुसार देण्यात येत आहेत.

तसेच, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील सर्व संलग्नित शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित तंत्रनिकेतनामध्ये शिक्षण घेणा-या तृतीयपंथीय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्या स्वनिधीतून भरण्यात यावे.

अशा तृतीयपंथीय विद्यार्थ्यांची ओळख प्रमाणिकरण संदर्भाधीन अधिनियमातील तरतूदीनुसार असणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२३१२०७११४६५१५७०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJIT MADHUKARRAO BAWISKAR

Digitally signed by AJIT MADHUKARRAO BAWISKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=deb455609479b6c7f30e7f1f9a8360c0f8600a542859e8fe229d6ea333415e8d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=99EB928028DF71EBDFCD2898E209D499192AD3899261FEAD42F7D38A3141AB69, cn=AJIT MADHUKARRAO BAWISKAR
Date: 2023.12.07 11:46:46 +05'30'

**( अजित बाविस्कर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
७. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
८. कुलगुरु, सर्व अकृषि विद्यापीठे महाराष्ट्र राज्य
९. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
११. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई
१२. सर्व सह/ उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
१३. निवडनस्ती (विशि-३).